महाराष्ट्र राज्य
कला शिक्षण मंडळ, मुंबई
सर ज. जी. कला शाळा आवार, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१. फोन. नं. ०२२ २५१७२१६९/७०
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

Maharashtra State
Board of Art Education, Mumbai
Sir J. J. School of Art compound, Dr. D. N. Road,
Fort, Mumbai- 400 001. Ph. No. 022 25172169 / 70
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

क्रमांक-कशिमं-२०२५/पाच/गुण भरणेबाबत/1306 दिनांक:- - 5 DEC 2025

वाचावे: १. मंडळाचे परीपत्रक क्र.कशिमं-२०२५/सात/सेल्फ लर्निंग/८३२ दि. २२.८.२०२५
२. मंडळाचे परीपत्रक क्र.कशिमं-२०२५/सात/टिचिंग प्लान/८३३ दि. २२.८.२०२५
३. मंडळाचे परीपत्रक क्रमांक. कशिमं-२०२५/सात/प्रात्याक्षिक परीक्षा/१०१७ दि. १०.१०.२०२५
४. मंडळाचे परीपत्रक क्रमांक. कशिमं-२०२५/सात/विद्यार्थ्यांची उपस्थिती/१२६८ दि. २.१२.२०२५
५. मंडळाचे परिपत्रक क्र. कशिमं/प्रथमसत्र २०२५-२६/पाच/१२५६ दि. ०२.१२.२०२५

## परिपत्रक

**विषय:- कला पदविका/प्रमाणपत्र विद्यार्थ्यांच्या प्रथम सत्राचे गुण संगणक प्रणालीद्वारे नमूद करण्यासाठीच्या आवश्यक सूचना.**

उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये सेल्फ लर्निंग व मायक्रो प्रोजेक्टच्या मार्गदर्शक सुचनांची अंमलबजावणी करणेबाबत कला परिसंस्थांना कळविण्यात आले होते. त्यासोबत सेल्फ लर्निंगच्या मुल्यांकनाचे विविध नमुने देण्यात आले होते.

उपरोक्त संदर्भ क्र.२ अन्वये टिचिंग प्लान व नियमित मुल्यांकनाची अंमलबजावणी करणेबाबत कळविण्यात आले होते. त्यासोबत नियमीत मुल्यांकनाचे विविध नमुने देण्यात आले होते.

उपरोक्त संदर्भ क्र. ३ अन्वये सत्राच्या शेवटीच्या प्रात्याक्षिक परीक्षेसंबंधी (Semester End Examination-SEE) मार्गदर्शक सुचना देण्यात आल्या होत्या व त्याची अंमलबजावणी करणेबाबत कळविण्यात आले होते. त्यासोबत प्रात्याक्षिक परीक्षेच्या मुल्यांकनाचे विविध नमुने देण्यात आले होते.

उपरोक्त संदर्भ क्र. ४ अन्वये विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबाबत तसेच उपस्थिती कमी असल्यास Detain करण्यासाठीच्या नियमाबाबत कळविण्यात आले होते.

उपरोक्त संदर्भ क्र. ५ अन्वये शासकीय उच्चकला परीक्षा-प्रथम सत्र (शैक्षणिक वर्ष २०२५-२६) परीक्षा आयोजनाच्या अनुषंगाने आवश्यक सूचना देण्यात आलेल्या आहेत.

सुधारीत पाठ्यक्रमाच्या प्रथम सत्राच्या थेअरी, प्रॅक्टिकल परीक्षा व सत्र परीक्षा समाप्ती (Semester End Examination-SEE) दि. ०३.१२.२०२५ ते २०.१२.२०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत. प्रथम सत्र परीक्षेस पात्र असलेल्या विद्यार्थ्यांच्या मुल्यांकनाचे थेअरी विषयाचे गुण CA(Continuous Assessment), प्रॅक्टिकल विषयाचे CA (Continuous Assessment) गुण, प्रॅक्टिकल विषयाचे गुण SEE (Semester End Examination) सर्व परीक्षा केंद्रानी संगणक प्रणाली द्वारे गुण मंडळाकडे पाठविणे आवश्यक आहे. तसेच परीक्षा केंद्रांनी परीक्षेच्या लॉग-ईन आईडी द्वारे गुण भरण्यासाठी संगणक प्रणालीची सुविधा दि. ०५.१२.२०२५ उपलब्ध करुन देण्यात येत आहे. याबाबतची लिंक मंडळाच्या **msbae.ac.in** या संकेतस्थळावर **Higher Art Exam** मेनू मध्ये लॉनइन आयडी मधील Marks Entry Theory CA (Continuous

Assessment), Practical CA (Continuous Assessment), SEE (Semester End Examination) या टॅबवर उपलब्ध आहे.

खालील बाबींचे गुण संगणक प्रणालीद्वारे भरावयाचे आहेत.

**१. थेअरी विषयाचे CA(Continuous Assessment) चे गुण :-**

- विद्यार्थ्यांच्या थेअरी विषयाचे CA(Continuous Assessment) साठी ३० गुण आहेत.
- यामध्ये २० गुण हे दोन युनीट टेस्टचे सरासरी गुण व १० गुण सेल्फ लर्निंगसाठी आहेत.
- दोन युनीट टेस्टच्या गुणांची सरासरी व सेल्फ लर्निंगच्या गुणांची बेरीज करुन ३० पैकी गुण विद्यार्थ्याला द्यावयाचे आहेत.
- यासाठी मंडळाने संदर्भ क्र. २ मध्ये Proforma for Continuous Assessment Theory **(A-5)** दिलेला आहे. सदर प्रोफार्मा मधील शेवटच्या रकान्यातील ३० पैकी गुण संगणक प्रणालीद्वारे भरावयाचे आहेत.

**२. प्रॅक्टिकल विषयाचे CA (Continuous Assessment) चे गुण :-**

- विद्यार्थ्यांच्या प्रॅक्टिकलकरीता CA(Continuous Assessment) साठी ५० गुण आहेत.
- याकरीता मंडळाने संदर्भ क्र २ मध्ये Proforma for Studio Work/Practical and Self Learning Marks **(A-4)** हा नमुना उपलब्ध करुन दिलेला आहे. त्यामध्ये ३५ गुण Practical Assessment व १५ गुण Self Learning साठी आहेत.
- विद्यार्थ्याला प्राप्त झालेले Practical Assessment चे व Self Learning चे एकत्रित गुण ५० पैकी संगणक प्रणालीद्वारे भरावयाचे आहेत.
- Proforma **(A-4)** मधील शेवटच्या रकान्यातील विद्यार्थ्याला प्राप्त झालेल्या गुण ५० पैकी संगणक प्रणालीद्वारे भरावयाचे आहेत.

**३. प्रॅक्टिकल विषयाचे SEE चे गुण :-**

- विद्यार्थ्यांच्या SEE (Semester End Examination) प्रॅक्टिकलचे ५० गुण आहेत.
- याकरीता मंडळाने संदर्भ क्र. ३ मध्ये Proforma for Practical Examination Marksheet (Summury Sheet **(A-14)**) दिलेला आहे.
- SEE (Semester End Examination) प्रॅक्टिकलसाठी २० गुण Internal Examiner ने व ३० गुण External Examiner ने द्यावयाचे आहेत.
- Proforma **(A-14)** मधील शेवटच्या रकान्यातील विद्यार्थ्याला प्राप्त झालेले ५० पैकी गुण संगणक प्रणालीद्वारे भरावयाचे आहेत.

ज्या विषयाला थेअरी व प्रॅक्टिकल एकत्रित आहे, अशा विषयाची यादी सोबत जोडली आहे. त्या विषयांचे थेअरी व प्रॅक्टिकलचे परीक्षा केंद्रांनी मुल्यांकन करुन, विद्यार्थ्याला प्राप्त झालेले गुण संगणक प्रणालीद्वारे भरावयाचे आहेत. इतर थेअरी विषयांच्या उत्तरपत्रिकांची तपासणी मंडळाने विहित केलेल्या मुल्यांकन केंद्रावर होणार आहे, Theory CA (Continuous Assessment) चे गुण मुल्यांकन केंद्राने भरावयाचे आहेत.

**संगणक प्रणालीद्वारे गुण भरण्यासंबंधी सूचना:-**

- अध्यापकांनी दिलेले गुण विद्यार्थ्याच्या शैक्षणिक कामगीरी नुसार दिलेली आहेत का याची खात्री करुन प्राचार्यांनी अध्यापकांच्या सहाय्याने अचूक गुण संगणक प्रणालीद्वारे भरावेत. एकदा भरलेल्या गुणांमध्ये कोणताही बदल करण्यात येणार नाही.

- विद्यार्थ्याला ८०% पेक्षा अधिक गुण व ४०% पेक्षा कमी गुण प्राप्त झाले असतील, अशा प्रकरणी प्राचार्यांनी सदर विद्यार्थ्यांच्या सर्व शैक्षणिक कामकाजाच्या रेकॉर्डची तपासणी करुनच गुणांची नोंद अध्यापकांच्या सहाय्याने संगणक प्रणाली मध्ये करावयाची आहे.
- ५० गुण पैकी १७, १८ व १९ इत्यादी गुण विद्यार्थ्याला प्राप्त झाले असतील तर ही क्रिटीकल केस म्हणून पुनश: तपासणी करुन गुण संगणक प्रणालीद्वारे भरावे.
- प्रोफार्मा **(A-4), (A-5) (A-14)** तसेच विद्यार्थ्यांच्या मुल्यांकनाबाबतचे विविध प्रोफार्मा अध्यापकांनी/प्राचार्यांनी सही करुन, सीलबंद पाकीटात प्राचार्यांकडे ठेवावे.
- विद्यार्थी Theory CA (Continuous Assessment), Practical CA (Continuous Assessment), Practical SEE (Semester End Examination) यास अनुपस्थित असेल तर AB नमूद करावे.
- विद्यार्थी Detain असेल तर, Theory CA(Continuous Assessment), Practical CA(Continuous Assessment), Practical SEE (Semester End Examination) मध्ये DIS नमूद करावे.
- गुणाबाबत विद्यार्थ्याची तक्रार आल्यास तसेच मंडळाला वाटल्यास सर्व मुल्यांकनाच्या रेकॉर्डची तपासणी मंडळामार्फत करण्यात येईल.
- गुण वेळेत भरले नाहीत तर विद्यार्थ्याचा निकाल घोषित करण्यास विलंब झाल्यास संस्थेस कारणीभूत ठरवून नियमाप्रमाणे शास्ती आकारण्यात येईल.
- मुल्यांकनाच्या नमुन्यातील गुणांमध्ये खाडाखोड नसावी.
- विद्यार्थ्याला प्राप्त झालेले गुण संगणक प्रणालीद्वारे **दि. १६.१२.२०२५** पर्यंत भरावेत.

वरील सूचनांचे पालन संस्थास्तरावर करण्यात यावेत. अचूक गुण भरण्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेच्या प्राचार्यांची राहील.

संगणक प्रणालीद्वारे गुण भरतांना काही अडचण असल्यास Software Support Person कु. वृशाली घोटणे मो. ९२८४३८१०४१ यांच्याशी संपर्क साधावा.

(विनोद दांडगे)
संचालक,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई

प्रति,

१) कुलसचिव, सर ज.जी. कला, वास्तुकला व अभिकल्प विद्यालय, मुंबई
२) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर
३) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर
४) प्राचार्य, सर्व संलग्नित शासनमान्य अशासकीय कला परिसंस्था.

प्रत,

१) सचिव, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई
२) निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३) सहाय्यक निरीक्षक, चित्रकला व शिल्प, विभागीय कार्यालय, नागपूर/छत्रपती संभाजीनगर
४) निवड नस्ती.

# थेअरी व प्रॅक्टिकल एकत्रित विषय असलेल्या विषयांची यादी

| Name of Program | Course Title | Course Code |
|---|---|---|
| Diploma in Applied Art | Design and Colour Fundamentals | 250312 |
| | Introduction to Advertising | 250314 |
| Diploma in Art Education | Print Making Techniques for Educators | 250612 |
| Art Master Certificate | Utility-Driven Design and Poster Design | 250712 |
| Art Teacher's Diploma | Colour Theory and Application | 250513 |
| Diploma in Art and Craft-Textile Design (Printing & Dyeing) | Design Fundamentals | 251013 |
| Diploma in Art and Craft-Textile Design (Weaving) | Design Fundamentals | 251013 |
| Diploma in Drawing and Painting | Two-Dimensional Design and Visual Narration | 250212 |
| Diploma in Sculpture and Modelling | History Of Indian Art- Part 1 | 250414 |
| | Sculpture Mediums Study -Part-1 | 250415 |
| Diploma in Art and Craft -Interior Decoration | Fundamentals of Design | 251211 |
| | Geometric Construction | 251214 |
| Foundation Certificate in Art and Design | Indian Traditional Folk Art and Craft | 250114 |

**टिप:-** वरील विषयाच्या थेअरी व प्रॅक्टिकलचे मुल्यांकन परीक्षा केंद्रावर करण्यात येणार आहे. परीक्षा केंद्रांनी मुल्यांकना नंतर गुणाची नोंद संगणक प्रणालीद्वारे करावयाची आहे.

Maharashtra State Board of Art Education * Mumbai *